Tribal Development Dept., Govt. of Maharashtra
Tribal Development Commissionerate
आदिवासी विकास आयुक्तालय
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र. २५७५६१५, २३१७९३८ ई-मेल :- admnctd.nsk-mh@gov.in
वेबसाईट :- www.mahatribal.gov.in

जा.क्र.प्रशा-२०२५/प्र.क्र.३२/का.२(८) / 92100 दिनांक- १७.०२.२०२६

# आदिवासी विकास भरती २०२४

## जाहिर सूचना

दिनांक ५/१०/२०२४ रोजी आदिवासी विकास विभागातील १७ पदनामांच्या एकुण ६११ रिक्त पदभरतीसाठी सरळसेवा जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती.

**"वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक"** या सवंर्गाकरिता लेखी परिक्षा आय.बी. पी.एस.मार्फत लेखी परिक्षा घेण्यात आली होती. **अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर विभागातील "वरिष्ठ लिपीक/ सांख्यिकी सहाय्यक"** या सवंर्गाकरिता समांतर आरक्षाणानुसार **अंशकालीन** उमेदवारांची **निवड सुची व प्रतिक्षा सुची** तयार करण्यात आली आहे.

सदर यादी **https://tribal.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सोबत- यादी**

मा.आयुक्त महोदया यांच्या मान्यतेने

दिलीप खोकले
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
आयुक्त, आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य, नाशिक

कार्यालय
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गिरीपेठ, अमरावती रोड, नागपूर - 440010
दुरध्वनी क्र. 0712-2560127, 2560314 संकेतस्थळ - atenagpur.com ई-मेल atc.ngp-mh@gov.in, atcngpest1@gmail.com

क्रमांक आस्था-2025/प्र.क्र./का-4(2)/६०० दिनांक :-१३/02/2026

प्रति,
मा. आयुक्त,
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय :-** **वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक** संवर्गातील सरळसेवा भरती -2024 अंशकालीन या समांतर आरक्षणाची निवड सुची/ प्रतिक्षा सुची प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ :-**
1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13-अ दिनांक 04.05.2022
2. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-2022/प्र.क्र.2/2022/आ.पु.क. दि. 30.09.2022
3. आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे जाहिरात क्र. आस्था-पद भरती -2024/ प्र.क्र.59/ का.2(2)/नाशिक दिनांक 05.10.2024.
4. आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे पत्र क्र. प्रशा-2025/ प्र.क्र.32/का.2(8)/दि23.07.2025.
5. या कार्यालयाचे पत्र क्र. आस्था-2025/प्र.क्र./का-4(2)/4832 दिनांक 26.9.2025
6. प्रादेशिक निवड समिती, आदिवासी विकास, नागपूर दिनांक 30.09.2025 रोजीचे कार्यवृत्त.
7. या कार्यालयचे पत्र क्र. आस्था-2025/प्र.क्र./का-4(2)/5343 दिनांक 03.11.2025
8. प्रादेशिक निवड समिती, आदिवासी विकास, नागपूर दिनांक 13.02.2026 रोजीचे कार्यवृत्त.

महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास सविनय सादर करण्यात येते की, आदिवासी विकास विभागातील **वरिष्ठ लिपिक/ सांख्यिकी सहाय्यक** या पदाची लेखी परीक्षा दिनांक 20.04.2025 ते 22.04.2025 या कालावधीत घेण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने नागपूर प्रादेशिक विभागातील **वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक** संवर्गातील उतीर्ण उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक 23.07.2025 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. **वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक** या पादाकरीता गुणवत्ता यदीतील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार उमेदवरांचे मुळ कागदपत्राची पडताळणी दिनांक 18.08.2025 व 19.08.2025 तसेच अनुपस्थित उमेदवारांची दिनांक 03.09.2025 रोजी झालेली आहे.

तथापि कागदपत्र पडताळणीत अंशकालीन या समांतर आरक्षण प्रवर्गातून ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अंशकालीन प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याने वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यकाची खालील पदे संस्थगित ठेवण्यात आलेली होती.

| अ.क्र. | सामाजिक व समांतर आरक्षणाचा प्रकार | भरावयाची पदे |
|---|---|---|
| 1 | खुला (अंशकालीन) | 1 |
| 2 | अ.जा. (अंशकालीन) | 1 |
| 3 | इमाव (अंशकालीन) | 1 |
| 4 | आदुघ (अंशकालीन) | 1 |
| 5 | साशैमाप्र (अंशकालीन) | 1 |
| | **एकूण** | 5 |

जाहिरातीत नमूद केलेल्या अटीनुसार शासकीय कार्यालयमध्ये 3 वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या उमेदवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड केलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्राच्या

Scanned with OKEN Scanner

पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील असे नमूद केलेले आहे. तेव्हा अंशकालीन या समांतर आरक्षण प्रवर्गात अर्ज केलेल्या एकूण 70 उमेदवारांना अंशकालीन कर्मचारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र तात्काळ या कार्यालयास सादर करण्याबाबत संदर्भ क्रमांक 7 अन्वये कळविण्यात अले होते. तसेच ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने 06 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले त्यापैकी 03 उमेदवारांनी अंशकालीन प्रमाणपत्र सादर केले त्यामुळे 03 उमेदवारांना या कार्यालयात दिनांक 28.01.2026, 04.02.2026 व अनुपस्थित उमेदवारांना दिनांक 09.02.2026 रोजी बोलविण्यात आले होते. त्यापैकी 02 उमेदवार उपस्थित झाले व 01 उमेदवार संधी देऊनही उपस्थित झाले नाही.

त्याअनुषंगाने अंशकालीन या समांतर आरक्षण प्रवर्गाकरीता उपस्थित खुला(अंशकालीन) व अ.जा.(अंशकालीन) उमेदवारांची निवड/प्रतिक्षा सुची तयार करण्यात आलेली असून प्रसिध्द करण्यात येत आहे.

तद्वतच इमाव (अंशकालीन), आदुघ (अंशकालीन) आणि साशैमाप्र (अंशकालीन) या प्रवर्गात अर्ज केलेल्या उमेदवारांनी अंशकालीन प्रमाणपत्र सादर केलेल नाही करीता सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक 25 जानेवारी, 2024 मधील परिच्छेद 7 मध्ये समांतर आरक्षण एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातील दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थलांतरीत करता येणार नाही. एका सामाजिक आरक्षणा अंतर्गत समांतर आरक्षणासाठी घटक निहाय राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे संबंधीत समांतर आरक्षण घटकासाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, त्या-त्या सामाजिक प्रवर्गात गुणवत्तेवर देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी अशी तरतुद आहे.

त्यामुळे इमाव (अंशकालीन) 01 पद, आदुघ (अंशकालीन) 01 पद आणि साशैमाप्र (अंशकालीन) 01 पद या प्रवर्गात पात्र उमेदवार उपलब्ध नसल्याने सदरची पदे इमाव (सर्वसाधारण) 01 पद, आदुघ (सर्वसाधारण) 01 पद आणि साशैमाप्र (सर्वसाधारण) 01 पद या सामाजिक प्रवर्गात बदलण्यात येत असून सदर पदे इमाव (सर्वसाधारण), आदुघ (सर्वसाधारण) आणि साशैमाप्र (सर्वसाधारण) या सामाजिक प्रवर्गाकरीता या कार्यालयाचे कार्यवृत्त दिनांक 30.09.2025 अन्वये तयार करण्यात आलेल्या निवड व प्रतिक्षा सुचीमधील प्रतिक्षेत असलेल्या उमेदवारांमधून भरण्याबाबत प्रादेशिक निवड समिती, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक 8 च्या कार्यवृत्तांतामध्ये निर्णय घेतला आहे.

त्याअनुषंगाने सदर अंशकालीन या समांतर आरक्षणाची निवड सुची व प्रतिक्षा सुची आयुक्तालयाचे स्तरावरुन संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, हि विनंती.

**सहपत्र- वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक अंशकालीन या समांतर आरक्षणाची निवड सुची व प्रतिक्षा सुची**

आपली विश्वासु

23/02/26

(आयुषी सिंह, भा.प्र.से.)
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर

Scanned with OKEN Scanner

# वरिष्ठ लिपिक/सांख्यिकी सहाय्यक (अंशकालीन या समांतर आरक्षणामधील) निवड सुची व प्रतिक्षा सुची

## खुला (अंशकालीन) निवड व प्रतिक्षा सुची

| अ.क्र. | गुणवत्ता यादीतील अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग | आसन क्रमांक | लेखी परीक्षेचे एकूण गुण | प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4093 | श्री. विचित्रकुमार यशवंत भातनकर | अ.जा. | 2760001370 | 200 | 94 | खुला (अंशकालीन) |

## अ.जा. (अंशकालीन) निवड व प्रतिक्षा सुची

| अ.क्र. | गुणवत्ता यादीतील अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा प्रवर्ग | आसन क्रमांक | लेखी परीक्षेचे एकूण गुण | प्राप्त गुण | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4341 | श्री. प्रमोद शामराव मेश्राम | अ.जा. | 2760000337 | 200 | 90 | अ.जा. (अंशकालीन) |

स्वा/-
श्री. वाहीद शेख
सदस्य प्रादेशिक निवड समिती तथा
सहाय्यक प्रकल्प अधिकारी
ए.आ.वि.प्र. गडचिरोली

स्वा/-
श्री. विकास राऊळकर
सदस्य, प्रादेशिक निवड समिती तथा
सहाय्यक आयुक्त (लेखा)
आदिवासी विकास, नागपूर

स्वा/-
श्री. डिगांबर चव्हाण,
सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती तथा
उपायुक्त,
आदिवासी विकास, नागपूर

स्वा/-
श्रीमती, आयुषी सिंह, भा.प्र.से.
अध्यक्ष, प्रादेशिक निवड समिती तथा
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नागपूर

Scanned with OKEN Scanner